आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२३ मे २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- बुद्धपौर्णिमे निमित्त देशभर विविध कार्यक्रमांमधून तथागत गौतम बुद्धांना वंदन

- लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातल्या प्रचाराचा आज अखेरचा दिवस/ सातव्या टप्प्यातल्या प्रचाराला जोर

- भारताची सायबर सुरक्षा क्षमता बळकट करण्याची गरज असल्याचं सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांचं प्रतिपादन

- मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधू आणि अश्मिता चालिहा यांची विजयी सलामी

**आणि**

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. एन. पाटील यांचं निधन

**<><><><><>**

वैशाख पौर्णिमा म्हणजेच बुद्ध पौर्णिमा आज देशाच्या विविध भागात साजरी होत आहे. भगवान बुद्धांचा जन्मदिवस आणि त्यांच्या ज्ञान प्राप्तीचा हा दिवस त्यांच्या शिकवणीचं स्मरण करुन साजरा करण्यात येत आहे. तथागत गौतम बुद्धांशी संबंधित स्थळांवर भाविकांची गर्दी झाली असून विविध ठिकाणी बुद्धमूर्तीच्या मिरवणुका काढण्यात आल्या आहेत. तसंच विशेष प्रार्थना आणि प्रवचन कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी बुद्ध पौर्णिमेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान गौतम बुद्धांनी सत्य, अहिंसा, समरसता आणि मानवतेसाठी आणि सर्व सजीवांकरिता प्रेमाचा संदेश दिला आहे.

भगवान बुद्धांची सहिष्णुता, आत्म-जागरूकता आणि सद्वर्तनाची शिकवण सर्वांना मानवतेची सेवा करण्यास प्रेरित करते असं राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

भगवान बुद्धांची चार उदात्त सत्य आणि अष्टपदी मार्ग हे लोकांना करुणा आणि अहिंसेच्या दिशेने मार्गदर्शन करतात असं धनखड यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

भगवान बुद्धांच्या शिकवणीनुसार पृथ्वीवर शाश्वत आणि समृद्ध पर्यावरण विकासाकरता गेली १० वर्ष आपलं सरकार झटत असल्याचं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही बुद्धपौर्णिमेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी बुद्धपौर्णिमेनिमित्त राज्यातल्या जनतेला नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान बुद्धांनी दिलेली अहिंसा, शांती आणि करुणेची शिकवण व्यक्ती, समाज तसंच राष्ट्रांना नेहमीच मार्गदर्शक आहे. आज ही शिकवण पूर्वीपेक्षा अधिक प्रासंगिक आहे, असं राज्यपालानी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही बुध्दपौर्णिमेनिमित्त सर्व भारतीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

लोकसभेच्या सहाव्या टप्प्यातला प्रचाराचा आज शेवटचा दिवस. या टप्प्यात उत्तर प्रदेशाच्या १४, हरयाणाच्या १०, हिमाचल प्रदेशाच्या ४, बिहारच्या ८, आणि उत्तराखंडाच्या ८, ओदिशातल्या ६ अशा एकूण ५७ मतदारसंघांमध्ये येत्या शनिवारी मतदान होणार आहे. याखेरीज जम्मू काश्मीरमध्येही अनंतनाग-राजौरी मतदारसंघात शिल्लक राहिलेलं मतदान शनिवारी होणार आहे. पुरीमध्ये भाजपाचे

संबित पात्रा विरुद्ध बिजू जनता दलाचे उमेदवार, माजी आयपीएस अधिकारी अरुप पटनाईक हे महत्वाचे उमेदवार निवडणूकीत आपलं भवितव्य अजमावणार आहेत. या राज्यांमध्ये आपापल्या उमेदवारांसाठी सर्वपक्षीय प्रचार शिगेला पोचला आहे. भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा, उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा हे आज ओदिशात सभा घेत आहेत. संबळपूरमध्ये केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान, बिजू जनता दलाचे प्रणब प्रकाश दश आणि काँग्रेसचे नागेंद्र प्रधान यांच्यामध्ये तिरंगी लढत आहे. बिहारमध्येही आज प्रचाराचा शेवटचा दिवस. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आज पूर्वी-चंपारणमध्ये आरेराज, सुगौली इथं तसंच पश्चिमी - चंपारणमध्ये सभा घेणार आहेत. बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख मायावती यांची प्रचारसभा बिहारमध्ये बक्सर इथे होणार आहे. राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी प्रकाश यादव यांच्याही अनेक मतदारसंघात लागोपाठ सभा आहेत.

**<><><><><>**

लोकसभेच्या पंजाबमधल्या १३ जागांसाठी, सातव्या टप्प्यात म्हणजे एक जूनला मतदान होणार आहे. त्यामुळे पंजाबमध्ये प्रचाराला रंग चढू लागला आहे. भाजपाचे जेष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज पंजाबमध्ये पटियाला इथं प्रचारसभा घेणार आहेत. पटियालात पोलो मैदानावर त्यांच्या सभेसाठी कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. गुरदासपूर आणि जालंधर इथे उद्या मोदी यांच्या प्रचारसभा आहेत. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंग मान हेसुद्धा वेगवेगळ्या मतदारसंघात प्रचारसभा घेत आहेत. काँग्रेस, शिरोमणी अकाली दल तसंच बहुजनसमाज पक्षाचे नेत्यांच्याही पंजाबात वेगवेगळ्या ठिकाणी प्रचारसभा आहेत.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल मधे इतर मागासवर्गीयांना २०१० पासून दिलेली सर्व जात प्रमाणपत्र कोलकाता उच्च न्यायालयानं रद्दबातल ठरवल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र

मोदी यांनी पश्चिम बंगाल राज्यसरकारवर टीका केली आहे. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वात तृणमूल काँग्रेस मतपेढी डोळ्यासमोर ठेवून तुष्टीकरणाचं राजकारण करत असल्याचा आरोप त्यांनी का दिल्लीतल्या प्रचारसभेत केला. मागासवर्गियांचं आरक्षण हिरावून घेण्याचा ममता बॅनर्जी यांचा प्रयत्न असल्याचा आरोप भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी केला.

<><><><><>

भारताची सायबर सुरक्षा क्षमता बळकट करण्याची गरज असल्याचं आग्रही प्रतिपादन सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी काल नवी दिल्ली इथं केलं. एक्ससाईज सायबर सुरक्षा २०२४ या कार्यक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते. सायबर सुरक्षा संदर्भात काम करणाऱ्या सर्व यंत्रणांनी समन्वय असावा यावर त्यांनी भर दिला तसंच भविष्या उद्भवणाऱ्या सायबर धोक्यांचा विचार करुन सध्या सुरु असलेल्या कामाचंही त्यांनी कौतुक केलं. २० ते २४ मे दरम्यान संरक्षण दलाच्या सायबर शाखेद्वारे व्यापक सायबर संरक्षण सराव आयोजित केला जात आहे. अशी माहिती यावेळी देण्यात आली.  हा सराव विविध लष्करी विभाग आणि सायबर संबंधित प्रमुख राष्ट्रीय संघटनांमधील सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे.

<><><><><>

मलेशियात क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधू आणि अश्मिता चालिहा यांनी आपापले सामने जिंकत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. महिला एकेरीत सिंधूनं दक्षिण कोरियाच्या यू जिन हिचा २१-१३, १२-२१, २१-१४ असा पराभव केला तर अश्मितानं अमेरिकेच्या बेईवेन झान्ग हिला २१-१९, १६-२१, २१-१२ असं हरवलं.

पुरुषांच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत आज दुपारी भारताच्या किरण जॉर्जचा सामना मलेशियाच्या झी जिया ली याच्याशी होणार आहे. पुरुष दुहेरीच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या साई प्रतीक आणि कृष्णा प्रसाद गारगा यांची लढत चीनच्या रेन क्सीआंगयु आणि जी तींग हे या जोडीशी तर महिला दुहेरीच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांचा सामना तैवानच्या सुंग शुओ युन आणि चेन यू या जोडीशी होणार आहे.

<><><><><>

बेल्जीयममधे अँटवर्प इथं सुरु असलेल्या एफ आय एच प्रो लीग हॉकी स्पर्धेच्या पुरुष फेरीत भारतीय संघानं अर्जेंटिनाचा शूटआऊट मध्ये ५-४ अशा गोलफरकाने पराभव केला. नियमित वेळेत हा सामना २-२ असा गोलबरोबरीत सुटल्याने दोन्ही संघांदरम्यान शूटआऊट फेरी घेण्यात आली. शूटआऊट मध्ये भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि सुखजीत यांनी प्रत्येकी दोन तर अभिषेक सिंगनं एक गोल झळकावला.

भारतीय पुरुष संघाचा पुढचा सामना उद्या यजमान बेल्जीयमच्या संघाबरोबर होणार आहे.

<><><><><>

भारतीय महिला हॉकी संघाला काल झालेल्या पहिल्या समान्यात अर्जेंटिनाकडून हार पत्करावी लागली.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात रॉजस्थान रॉयल्सनं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा चार गडी राखून पराभव केला.

या स्पर्धेचा दुसरा पात्रता फेरीचा सामना उद्या राजस्थान रॉयल्स आणि सनाराईजर्स हैदराबाद यांच्यात चेन्नई स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता

होणार आहे. या सामन्यातला विजेता संघ येत्या रविवारी अंतिम सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स संघासोबत खेळेल.

**<><><><><>**

जपानमध्ये कोबे इथं सुरु असलेल्या पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या सचिन सर्जेराव खिलारी यानं पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेत आज सुवर्णपदक पटकावलं. त्यानं एफ-४६ प्रकारात १६ पूर्णांक ३० मीटर अंतरावर गोळाफेक करून नवीन आशियाई विक्रमही स्थापित केला.

भारताच्याच धरमबीर यानं खंजीरफेक स्पर्धेत काल कांस्य पदक पटकावलं. त्यानंही ३३ पूर्णांक ३१ मीटर अंतरासह एफ-५१ प्रकारात नवीन आशियाई विक्रम स्थापित केला.

या पदकांसह आता ५ सुवर्ण, ४ रौप्य आणि ३ कांस्य पदकांसह भारताची एकूण पदकसंख्या १२ झाली आहे.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष, आणि करवीर आमदार पी. एन. पाटील यांचे आज पहाटे आकस्मिक निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते.पी. एन. पाटील यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात काँग्रेसमधून केली होती. १९७८ ते १९८५ या काळात जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून त्यांचा राजकीय प्रवास सुरु झाला. कोल्हापूर जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष, अध्यक्ष, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अशा पदांवर त्यांनी काम केलं. त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी काँग्रेस समिती कार्यालयात ठेवलं होतं. पी एन पाटील यांच्यावर सरकारी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत.**अशा शब्दात** राज्य **काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला** यांनी पाटील यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

पी. एन. पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दु:खद आणि धक्कादायक असून एक निष्ठावंत आणि कर्तव्यनिष्ठ लोकसेवक काळाच्या पडद्याआड गेला आहे

अशा शब्दात **महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले** यांनी पाटील यांना श्रद्धांजली वाहिली.

पी एन पाटील यांच्या निधनाने कोल्हापूरच्या सामाजिक, राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे अशा शब्दात **उपमुख्यमंत्री अजित पवार** यांनी पाटील यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करुन श्रद्धांजली वाहिली.

**//<><><><><>//**